महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# शिकाऊ उमेदवार (कोपा, वीजतंत्री व तारतंत्री)

# जाहिरात

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित संवसु मंडळ, अकोला अंतर्गत संवसु मंडळ कार्यालय, अकोला- **कोपा 13**, शहर विभाग अकोला-**कोपा 07, वीजतंत्री 14, तारतंत्री 14**, ग्रामीण विभाग अकोला- **कोपा 10, वीजतंत्री 23, तारतंत्री 20** व अकोट विभाग- **कोपा 05, वीजतंत्री 15, तारतंत्री 15** प्रशिक्षणार्थी **कोपा, वीजतंत्री व तारतंत्री** पदे असे एकुण 136 पदे भरण्याकरिता पात्र शिकाऊ उमेदवाराची निवड समितीद्वारे गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. त्याकरीता पात्र शिकाऊ उमेदवारांनी **दि.15.12.2025 चे सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत** www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करुन ऑनलाईन अर्ज करावा. सर्व प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे उमेदवारानी कार्यालयात येण्याची गरज नाही. शिकाऊ उमेदवारांचे निवडीबाबतची सुचना उमेदवाराचे नोंदणीकृत मोबाईल क्र. व ईमेल आयडी (E-mail ID) वर पाठविण्यात/कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती** - 1) शिकाऊ उमेदवारांचे वय किमान 18 वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. 2) सदर उमेदवार हा अकोला जिल्ह्यातील रहिवासी असावा. 2) **शैक्षणिक पात्रता : अ)** महाराष्ट्रातील मान्यता प्राप्त (10+2) व महाराष्ट्रातील शासनमान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन (कोपा, वीजतंत्री व तारतंत्री व्यवसाय) मागास प्रवर्गातील (अ.ज. व अ.जा. करिता) उमेदवारांकरिता **55% गुण** व उर्वरित प्रवर्गाकरिता किमान **60% गुण** मिळवुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, **ब)** मागासवर्गिय उमेदवारांची निवड भारतीय शिकाऊ उमेदवार कायदयानुसार करण्यात येईल. त्याकरिता उपविभागीय अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. **क)** उमेदवारांने www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. **ड)** कोपा, वीजतंत्री व तारतंत्री या संवर्गाचा प्रशिक्षण कालावधी एक वर्षाकरिता राहिल. **इ)** प्रशिक्षण कालावधीत शिकाऊ उमेदवारांना शासकीय नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. **ई)** उमेदवारांची Profile परिपुर्ण असणे आवश्यक आहे तसेच आधारकार्ड, जातीचे प्रमाणपत्र व Profile वरील माहिती सारखी असावी सदर अपुर्ण Profile असणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. **उ)** निवड झालेल्या पात्र उमेदवाराने सोबत येतांना आपली सर्व मुळ कागदपत्रे व त्यांची साक्षांकित दोन छायाप्रती सोबत आणावी. **ऊ)** प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेवारांना कंपनीच्या सेवेत सामावुन घेणे बंधनकारक नाही याची नोंद घ्यावी. **ए)**जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

**अधिक्षक अभियंता संवसु मंडळ,**
**महावितरण, अकोला**

**PRO No. :- 110/2025**